4472

जा.क्र.जिपऔ/साप्रवि/10-प्रशासन/कावी/2019

कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद

दिनांक :-25/6/2019

प्रति,

**संपादक,** ---------

------------------------

------------------------

**विषय** :- माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी प्रेस नोट प्रसिध्द करणे बाबत

**संदर्भ** :- 1) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण/2018/प्र.क्र. 45/ कार्या-6 मादाम काम मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय मंबई दिनांक 26.11.2018

2) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.2018/साशा/ संकीर्ण/मा.अ./कावी-2227 दिनांक 20.12.2018.

3) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.जिपऔ/साप्रवि/10-प्रशासन/कावी2019/823 दि. 15.2.2019

उपरोक्त विषयी विनंती करण्यात येते की, संदर्भ क्रमांक 1 चे शासन परिपत्रक व संदर्भ क्रं. 2 च्या पत्रानुसार केंद्रीय माहिती अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत शासकीय कामकाजात अधिक पारदर्शकता येण्यासाठी जिल्हा परिषदा अंतर्गत सर्व कार्यालयात प्रत्येक सोमवारी किंवा सदर दिवशी सार्वजनिक सुटटी असल्यास त्यानंतरच्या कार्यालयीन दिवशी दुपारी 3.00 ते 5.00 या वेळेत नागरिकांना अभिलेख अवलोकनासाठी उपलब्ध करून देण्याबाबत सोबत प्रेस नोट देण्यात येत आहेत..

करीता सोबतच्या प्रेस नोटची प्रसिध्दी आपले वर्तमान पत्रातून देण्यात यावी. ही विनंती.

**सोबत**:- प्रेस नोट

**स्वाक्षरीत**/-

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी** (सा.)

जिल्हा परिषद औरंगाबाद

**प्रतिलीपी**:-

1) माहिती तंत्रज्ञान कक्ष, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद औरंगाबाद यांना देवून कळविण्यात येते की, आपल्या स्तरावरून सदरील प्रेस नोट जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

2) सर्व शाखा प्रमुख, प्रस्तुत कार्यालय, यांना आवश्यक त्या कार्यवाहीस्तव.

**शिरीष द बनसोडे**

**उप मुख्य कार्यकारी अधिकारी** (सा.)

जिल्हा परिषद औरंगाबाद